**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शनिवार दिनांक ०५ एप्रिल २०२५**

**ठळक बातम्या**

1. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना श्रीलंकेचा सर्वोच्च नागरी सन्मान प्रदान.
2. रोजगाराच्या संधी लक्षात घेऊन विद्यार्थ्यांना शिक्षण द्या - केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे नागपुरात आवाहन.
3. एमआयडीसी असलेल्या गावांना औद्योगिक नगरीचा दर्जा देण्यासंदर्भात धोरण तयार करण्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निर्देश.
4. नागपूरच्या प्रसिद्द पोद्दारेश्वर मंदिर राम नवमी शोभायात्रेसाठी वाहतूक व्यवस्थेत बदल.

---------------------------------------

**पंतप्रधान नरेंद्र मोदी -श्रीलंका दौरा**

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या श्रीलंका दौऱ्यात आज दोन्ही देशांमध्ये ऊर्जा, संरक्षण सहकार्य, डिजिटल तंत्रज्ञान, औषधनिर्माण, आरोग्य अशा एकूण सात महत्त्वपूर्ण क्षेत्रांमध्ये सामंजस्य करार झाले. मोदी आणि श्रीलंकेचे अध्यक्ष अनुरा कुमारा दिसानायके यांच्यात प्रतिनिधीमंडळ स्तरावर चर्चा झाल्यांनतर केलेल्या संयुक्त निवेदनात दोन्ही नेत्यांनी आपली भूमिका मांडली. यावेळी पंतप्रधान मोदी म्हणाले.....**

***शामपुर सोलर पावर प्लांट से श्रीलंका की ऊर्जा सुविधा में मदद मिलेंगे। मल्टी प्रॉडक्ट पाइप लाइन के निर्माण और त्रिंको मालियों को ऊर्जा हब के रूप में विकसित किए जाने के लिए जो समझौता हुआ है उसका लाभ श्रीलंका के सभी लोगों को मिलेगा दोनों देशों के बीच ग्रिड इंटरकनेक्टिविटी समझौते से श्रीलंका के लिए बिजली एक्सपोर्ट करने के विकल्प खुलेंगे।***

**यावेळी मोदी यांना 'श्रीलंका मित्र विभूषण' हा श्रीलंकेचा सर्वोच्च नागरी पुरस्कार प्रदान करण्यात आला. भारताच्या 'शेजारी देशांना प्राधान्य' धोरणात आणि व्हिजन महासागर संकल्पात श्रीलंकेला विशेष स्थान असल्याचं सांगून प्रधानमंत्र्यांनी श्रीलंकेची वाटचाल प्रगतीपथाकडे होत असल्याबद्दल समाधान व्यक्त केलं. शेजारी देशांची सुरक्षितता एकमेकांच्या सहकार्यावर अवलंबून**

असल्यानं भारत-संयुक्त अरब अमिरात आणि श्रीलंका यांच्यात सुरक्षा करार महत्त्वाचा आहे, असं प्रधानमंत्र्यांनी सांगितलं. भारत आणि श्रीलंकेतल्या मच्छिमारांच्या प्रश्नाबद्दल मानवतावादी दृष्टिकोनानं तोडगा काढण्यावर सहमती झाल्याचंही त्यांनी सांगितलं. भविष्यात दोन्ही देशांमधली भागीदारी नव्या उंचीवर नेण्यासाठी वचनबद्ध असल्याचा पुनरुच्चार त्यांनी केला. श्रीलंकेतल्या काही मंदिरांच्या निर्मितीसाठी भारत सहकार्य करेल, असं ते म्हणाले.

-------------------------------------

स्थलांतर आणि परदेशी नागरिक विधेयक

स्थलांतर आणि परदेशी नागरिक विधेयक २०२५ वर राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी स्वाक्षरी केली आहे. परदेशी नागरिकांचा भारत प्रवेश, वास्तव्य आणि स्थलांतर याविषयीचे नियम या विधेयकात आहेत. यापूर्वीचे पारपत्र कायदा १९२०, परदेशी नागरिक नोंदणी कायदा १९३९, तसंच परदेशी नागरिक कायदा १९४६ आणि भारतात स्थलांतर कायदा २००० हे ब्रिटीशकालीन कायदे या नव्या कायद्याने मोडीत काढले आहेत. गेल्या आठवड्यात संसदेने हे विधेयक मंजूर केलं. नवीन कायद्यानुसार बनावट पारपत्र वापरणं किंवा पुरवणं या गुन्ह्यांकरता ७ वर्षांपर्यंत कैद आणि १० लाख रुपयांपर्यंत दंड अशा शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे.

-------------------------------------

रिझर्व्ह बँक

रिझर्व्ह बँक लवकरच दहा आणि पाचशे रुपयांच्या नवीन नोटा जारी करणार आहे. त्यावर रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांची स्वाक्षरी असेल. या नोटांची रचना महात्मा गांधींचा फोटो असलेल्या नवीन मालिकेतील दहा आणि पाचशे रुपयांच्या नोटांसारखी असेल. रिझर्व्ह बँकेने आधीच जारी केलेल्या १०० आणि ५०० रुपयांच्या नोटा चलनात राहतील, असं या वृत्तात म्हटलं आहे.

-------------------------------------

विद्यापीठ अनुदान आयोग

परदेशी शिक्षण घेऊन नंतर पुन्हा भारतात उच्च शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी मानकीकरणाची व्यवस्था उपलब्ध करून देण्याचा निर्णय विद्यापीठ अनुदान आयोगाने घेतला आहे. आयोगाचे अध्यक्ष मामिदला जगदेश कुमार यांनी जारी केलेल्या अधिसूचनेत म्हटलंय की परदेशी शिक्षणसंस्थांमधून घेतलेल्या पदव्या, पदविका आणि इतर पात्रता प्रमाणपत्रांना मान्यता देऊन,

भारतातल्या शिक्षणसंस्थांच्या परिप्रेक्ष्यात त्यांचं मानकीकरण करण्यासाठी तंत्रज्ञानावर आधारित आणि पारदर्शी पद्धत आयोगाने विकसित केली आहे.

---------------------------------------

नितीन गडकरी

आपल्या भागात ज्या प्रकारचे उद्योग आज आहेत किंवा भविष्यात येणार आहेत, त्यांचा विचार करून कौशल्याधारित अभ्यासक्रम सुरू व्हायला हवेत. त्यादृष्टीने रोजगाराच्या संधी लक्षात घेऊन विद्यार्थ्यांना शिक्षण आणि प्रशिक्षण द्यावे, असे आवाहन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी आज केले. हिंगणा इथं महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेच्या नागपूर प्रकल्पाअंतर्गत हिंगणा परिसरातील मुलींच्या वसतिगृहाचे भूमिपूजन गडकरी यांच्या हस्ते झाले, त्यावेळी ते बोलत होते. 'आपली संस्था मिहानच्याच शेजारी आहे. मिहानमध्ये इन्फोसिस, टेक महिंद्रा, एम्स, आयआयएम, एमआरओ मिहानमध्येच आहे. सर्व प्रकारचे उद्योग इथे आले आहेत आणि अजून मोठ्या कंपन्या येणार आहेत. त्या साऱ्यांना मनुष्यबळ लागणार आहे.

---------------------------------------

एमआयडीसी

एमआयडीसी असलेल्या गावांना औद्योगिक नगरीचा दर्जा देण्यासंदर्भात धोरण तयार करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. यासंदर्भातल्या आढावा बैठकीत काल ते बोलत होते. औद्योगिक क्षेत्राचा विकास अधिक वेगानं करण्यासाठी एमआयडीसी असलेल्या गावांना औद्योगिक नगरीचा दर्जा दिल्यास त्या गावांच्या विकासाबरोबरच संबंधित भागात मूलभूत सुविधा आणि पायाभूत प्रकल्पांचा विकास वेगानं होईल. त्याचप्रमाणे पाणीपुरवठा, रस्ते, वीज आणि इतर सुविधा सुधारण्यावर भर दिला जाईल, असं मुख्यमंत्री म्हणाले.

---------------------------------------

पोद्दारेश्वर मंदिर

नागपूर शहराच्या समृद्ध परंपरेचा भाग असलेली श्री पोद्दारेश्वर राममंदिराची ५९ वी भव्य शोभायात्रा उद्या ६ एप्रिल रोजी मोठ्या भक्तिभावाने निघणार आहे. या शोभायात्रेचे यंदाचे खास वैशिष्ट्य म्हणजे, या वर्षी प्रथमच श्री महालक्ष्मी जगदंबा संस्थान, कोराडी यांच्या चित्ररथाचा समावेश करण्यात आला आहे. रामजन्मोत्सव शोभायात्रा दुपारी 4 वा. प्रारंभ होईल, त्यानंतर ती इतवारी

शहीद चौकात 6 वा., महाल येथे सायं. 7.30 वा., कॉटन मार्केट येथे रात्री 9 वा. आणि सीताबर्डी येथे रात्री 10 वा. पोहोचण्याची शक्यता आहे. शोभायात्रेमुळे नागपूर शहरातील वाहतूक काही ठिकाणी बंद राहील, तर काही ठिकाणी वाहतुकीचे मार्ग वळविण्यात आले आहेत. यात उद्या दुपारी 12 ते संध्याकाळी सहा दरम्यान पोद्दारेश्वर राम मंदिर परिसरात पादचारी वगळता सर्व प्रकारच्या वाहतुकीवर बंदी असेल. अजंता हॉस्पिटलच्या प्रवेशद्वारासमोरील परिसरातून शोभायात्रेच्या रथासाठी मार्ग तयार केला जाईल. महाल, गांधी गेट, टिळक पुतळा, गणेश मंदिर वळण, अग्याराम देवी चौक, गीता मंदिर, कॉटन मार्केट चौक, लोखंडी पूल, आनंद टॉकीज, मुंजे चौक, झाशीराणी चौक, व्हेरायटी चौक, बर्डी मेन रोड, मानस चौक या दरम्यानच्या मार्गावरील वाहतूक प्रतिबंधित राहील. ज्या मार्गावरून शोभायात्रा जाते, त्या मार्गांवर उद्या सकाळी सहा वाजल्यापासून पार्किंग झोन राहणार आहे.अनेक मार्गांवरून वाहतूक वळविण्यात येणार असून नागरिकांनी सहकार्य करण्याचं आवाहन वाहतूक पोलिसांतर्फे करण्यात आलं आहे.

---------------------------------------

कृषिमंत्री माणिकराव कोकाटे

राज्यातल्या अनेक भागांना गेल्या दोन दिवसात अवकाळी पाऊस आणि गारपिटीचा फटका बसला आहे. २४ जिल्ह्यातल्या ११० तालुक्यांतल्या २६ ते २७ हजार एकरांवरच्या पिकांचं नुकसान झालं आहे. अवकाळीग्रस्त शेतकऱ्यांना भरपाई देण्यासाठी येत्या चार-पाच दिवसांत आपत्ती व्यवस्थापन विभागाची बैठक घेण्यात येईल, अशी माहिती कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी दिली. त्यावेळी ते बोलत होते.

---------------------------------------

हवामान

आगामी ७ एप्रिलपर्यंत विदर्भात हवामान सामान्य राहणार असल्याचा अंदाज नागपूरच्या प्रादेशिक हवामान खात्यानं व्यक्त केला आहे. ८ आणि ९ तारखेला चंद्रपूर, गडचिरोली, अकोला आणि यवतमाळमध्ये वादळी पर्जन्यमानाचा इशारा देण्यात आला आहे. आज अकोला इथं सर्वाधिक कमाल तापमान ३९ अंश सेल्सियस इतकं नोंदवण्यात आलं. नागपुरात ३७ पूर्णांक ४ दशांश अंश सेल्सिअस कमाल तापमानाची नोंद झाली.

---------------------------------------

**डॉ.विलास उजवणे**

ज्येष्ठ अभिनेते डॉ.विलास उजवणे यांचं काल मुंबईत निधन झालं. ते ६२ वर्षांचे होते. काही वर्षांपूर्वी त्यांना पक्षाघाताचा झटका आला होता. त्यानंतर त्यांना हृदयविकाराचाही त्रास जाणवू लागल्यानं त्यांची प्रकृती खालावत गेली. डॉ. उजवणे हे मूळचे नागपूरचे होते.

---------------------------------------

**'नाट्यरंग-नमन नटवरा'**

आज अंतर्नाद निर्मित आणि सप्तक आयोजित मोरेश्वर माधव देशपांडे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ 'नाट्यरंग-नमन नटवरा' हा साभिनय नाट्यगीतांचा कार्यक्रम उद्या सायंकाळी 6.30 वाजता नागपुरातील गायत्रीनगर येथील पर्सिस्टंट सिस्टिम्स, कवी कुलगुरु ऑडिटोरियम येथे आयोजित करण्यात आला आहे. कार्यक्रमाची संकल्पना आणि निवेदन गायत्री हरीश मोडक यांचे आहे, तर संयोजक गजानन रानडे हे आहेत.

---------------------------------------

**शॉर्टसर्किटमुळे आग**

भंडारा जिल्हयातल्या साकोली इथल्या सिव्हिल वॉर्डात शॉर्टसर्किटमुळे गोठ्यात आग लागून ७ म्हशी होरपळून ठार झाल्या तर ३ म्हशी गंभीर भाजल्या आहेत. शेतकरी भास्कर लांजेवार यांच्या गोठ्यावरून गेलेल्या विद्युत तारांमध्ये शॉर्टसर्किट झाल्यानंतर हा अपघात घडला.

---------------------------------------